**दि.कि.अर्ज क्र. ०१/२०१८**
शिवाजी **वि.** कोणी नाही
**CNR no.** MHPU1300000-3-2017

**<u>आदेश निशाणी क्र. १३ वर</u>**

**१.** सदरचा अर्ज हा ति—हाईत इसम कैलास महादेव ताम्हाणे याने दाखल केला असुन त्यात त्याने म्हणले आहे की, मुळ अर्जात नमुद केलेला मौजे वाळुंज ता. पुरंदर जि. पुणे येथील गट क्र. ३२४ ही मिळकत वस्तीपड आहे. सदरच्या मिळकतीमध्ये ति—हाईत इसमाचा हक्क आहे. अर्जदार यांचा सदर मिळकतीशी काहीही संबंध नाही. अर्जदार यांना वारस दाखला मिळाल्यास ति—हाईत इसमाचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब तो विनंती करतो की, त्यास अर्जाचे कामी जाब देणार म्हणून सामील करावे.

**२.** सदर अर्जास मुळ अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १६ वर दाखल केले असुन त्यात त्यांनी म्हणले आहे की, अर्जातील मजकुर खरा व बरोबर नाही. अर्जदार हे सिदु कृष्णा ताम्हाणे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांचे पुर्वअधिकरी मयत शिवा यांचे नाव सिदु असे दर्शविले आहे. परंतु शिवा व सिधु हे एकच इसम आहे. मुळ अर्जदार यानी सिदु कृष्णा ताम्हाणे यांचे हिश्श्यापुरता अर्ज केलेला आहे. त्यामुळे ति—हाईत इसमांना पक्षकार करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

**३.** अर्ज, अर्जाचे प्रतिज्ञापत्र व अर्जावरील म्हणणे वाचले. मुळ अर्जदारातर्फे श्री. खाडे वकील व ति—हाईत इसमातर्फे श्री. व्ही.टी. नाझीकर वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** मुळ अर्ज हा अर्जदारांनी ते सिदु उर्फ शिवा कृष्णा ताम्हाणे

यांचे वारस असल्याचा दाखला मिळावा यासाठी केलेला आहे. मुळ अर्जात अर्जदारांनी मौजे वाळुंज ता. पुरंदर जि. पुणे येथील गट क्र. ३२४ चा उल्लेख केलेला आहे. ति—हाईत इसमाचे म्हणण्याप्रमाणे त्याचा सदर मिळकतीमध्ये हक्क आहे. मुळ अर्जदार यांना वारस दाखला दिल्यास त्याचे नुकसान होणार आहे. सर्व वाद प्रश्न निकाली काढण्यासाठी ति—हाईत इसम यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली गेली पाहिजे. ति—हाईत इसमास अर्जात सामील केल्यास अर्जदारांचे काहीच नुकसान होणार नाही उलट अर्जाचे काम गुणदोषावर चालण्यास मदत होणार आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज खर्च रुपये ५००/— वर मंजुर करण्यात येतो.

**२.** ति—हाईत इसम यांनी १५ दिवसांचे आत खर्चाची रक्कम अर्जदार यांना देण्याची आहे.

**३.** खर्चाची रक्कम मिळाल्यापासुन १४ दिवसांचे आत मुळ अर्जदार यांनी ति—हाईत इसमास अर्जाचे कामी जाबदेणार म्हणुन सामील करावे व अर्जात तशी दुरुस्ती करावी.

सासवड
दिनांकः—१३/०२/२०१९

**(व्ही.बी.साळुंके)**
दिवाणी न्यायाधिश क, स्तर
सासवड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word for word as per original Order.

Name of Steno : Mr. K. N. Chopade, Stenographer (L.G.)

Court Name : V.B.Salunke
Judicial Magistrate First Class Saswad.

Date of Judgment : 13/02/2019

Judgment signed by presiding officer on : 13/02/2019

Judgment uploaded on : 13/02/2019